व्यापाऱ्यांकडूनही पाकिस्तानशी व्यवहार बंद

कॉन्फेड्रेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचा निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवाद्यांनी हल्ला केल्याने व्यापाऱ्यांनीही पाकशी व्यापार बंद करण्याचे ठरवले आहे. कॉन्फेड्रेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (कॅट) या व्यापाऱ्यांच्या संघटनेने पाकिस्तानसोबत तातडीने व्यापार थांबण्याचा निर्णय घेतला आहे. कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बी.सी. भरतिया यांनी ही माहिती नागपूर येथे माध्यमांशी बोलताना दिली.

कॅटच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक नुकतीच भुवनेश्वर येथे पार पडली. त्यात हा निर्णय सर्वानुमते घेतल्याचा दावा भरतीया यांनी केला. भरतीया म्हणाले, देशहितापुढे व्यापारी हित मोठे नाही. त्यामुळे संघटनेचे सर्व सदस्य पाकिस्तानसोबतचा व्यापार थांबवणार आहेत. कॅटच्या या निर्णयामुळे पाकिस्तानला साखर, सिमेंट, लोह पोलाद, ऑटोमोबाईल्स पार्ट, टायर-ट्यूब आदी वस्तूंची भारतातून होणारी निर्यात बंद होईल. भारतालाही पाकिस्तानमधून येणाऱ्या सुक्या मेव्याला मुकावे लागेल. जोवर पाकिस्तानी व्यापारी व ग्राहक त्यांच्या सरकारवर दबाव आणून दहशतवादावर नियंत्रण आणण्यासाठी सांगत नाहीत, तोवर आम्ही पाकिस्तानसोबत व्यापार करणार नाही, असे कॅटने म्हटले आहे.

कॉन्फेड्रेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (सीएआयटी) ही व्यापाऱ्यांची सर्वात मोठी संघटना आहे. देशभरात या संघटनेशी लहान, मोठे असे एकूण ४० हजार व्यापारी जुळलेले आहेत. चिल्लर विक्रेत्यांची संख्या ९ कोटींहून अधिक आहे.

न्या. भूषण गवई यांचा १४ मे रोजी शपथविधी

पीटीआय, नवी दिल्ली

न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई हे देशाचे पुढील सरन्यायाधीश असतील. संजीव खन्ना यांच्या निवृत्तीनंतर १४ मे रोजी गवई हे शपथ घेतील.

केंद्रीय कायदा मंत्रालयाने याबाबत परिपत्रक जारी करत, गवई हे ५२ वे सरन्यायाधीश असतील असे यात नमूद केले. खन्ना यांनी १६ एप्रिल रोजी केंद्र सरकारकडे गवई यांच्या नावाची शिफारस केली होती. गवई यांना २४ मे २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून बढती मिळाली होती. गवई यांना सरन्यायाधीश म्हणून सहा महिन्यांचा कालावधी मिळेल. २३ नोव्हेंबर रोजी ते निवृत्त होतील.

खन्ना यांच्यापाठोपाठ सर्वोच्च न्यायालयात सेवाज्येष्ठतेनुसार गवई हे दुसऱ्या क्रमांकावर आहेत. अमरावती येथे २४ नोव्हेंबर १९६० रोजी जन्मलेल्या भूषण गवई यांना मुंबई उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून १४ नोव्हेंबर २००३ रोजी बढती मिळाली. त्यांना उच्च न्यायालयात १२ नोव्हेंबर २००५ रोजी कायमस्वरूपी अतिरिक्त न्यायमूर्ती करण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयाच्या विविध घटनांपीठांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांत त्यांचा सहभाग होता. केंद्र सरकारने जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा रद्द करणारे अनुच्छेद ३७० हटवले होते. या निर्णयावर शिक्कामोर्तब करणाऱ्या पाच सदस्यीय घटनापीठात त्यांचा सहभाग होता. याखेरीज राजकीय पक्षांच्या निधीबाबत निवडणूक रोखे रद्द करण्याच्या निर्णयात पाच सदस्यीय घटनापीठात ते होते.

जळगावमध्ये सोने दरात ५१५ रुपयांची वाढ

जळगाव : मंगळवारी दिवसभरात पुन्हा ५१५ रुपयांची वाढ झाल्याने सोन्याचे दर प्रतितोळा ९९ हजार ३९५ रुपयांपर्यंत जाऊन पोहोचले.



शहरातील सराफा बाजारात सोमवारी २४ कॅरेट सोन्याचे दर ६१८ रुपयांची घट नोंदविण्यात आल्याने प्रतितोळा ९८ हजार ८८० रुपयांपर्यंत घसरले होते. मात्र, अक्षय्य तृतियेपर्यंत सोने आणखी कमी होण्याची अपेक्षा बाळगून असलेल्या ग्राहकांची त्यामुळे निराशा झाली. काही दिवसांपूर्वी सर्वकालिन उच्चांकी पातळीवर पोहोचलेले सोन्याचे दर अलीकडे नरमले असून, एक लाखांच्या खाली आले आहेत.

सरकारवर टीका करणाऱ्या यूट्यूब वाहिनीवर बंदी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : पाकिस्तानातील १६ यूट्यूब चॅनल्सवर बंदी आणल्यानंतर, मंगळवारी केंद्र सरकारने देशातील प्रामुख्याने उत्तर प्रदेशमध्ये लोकप्रिय असलेले '४पीएम' या यू ट्यूब चॅनलवरही सुरक्षेचे कारण देत बंदी घातली. या चॅनलने पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारला धारेवर धरले होते. इतकेच नव्हे तर थेट मोदी-शहांना लक्ष्य केले होते.

अत्यंत आक्रमक व अनेकदा भाजपविरोधी वृत्तांसाठी लक्षवेधी ठरणारे हे यू ट्यूब चॅनल बंद करण्यामागील नेमके कारण केंद्र सरकारकडून स्पष्ट करण्यात आलेले नाही. मात्र, सरकारच्या आदेशाने '४ पीएम' बंदी घालण्यात आली असल्याचा ई-मेल मंगळवारी पाठवण्यात आल्याचे या चॅनलचे प्रमुख संपादक संजय शर्मा यांचे म्हणणे आहे. पहलगाम हल्ल्यानंतर देशाच्या सुरक्षेचा मुद्दा महत्त्वाचा ठरल्याने केंद्र सरकारला जाब विचारला असेही शर्मा यांचे म्हणणे आहे. '४ पीएम'ने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यशैलीवर तसेच, धोरणांवर यापूर्वीही अनेकदा तीव्र टीका केली होती. पहलगाम हल्ल्यानंतर मोदी-शहांना लक्ष्य केले होते. त्यासंदर्भात आठवडाभरात काही वृत्तांत '४पीएम'च्या चॅनलवर अपलोड करण्यात आले होते. दहशतवादी हल्ला झालेल्या बैसरन पठारावर सुरक्षा व्यवस्था तैनात का नव्हती, असा प्रश्न विचारत मोदी-शहांना टीकेचे धनी करण्यात आले होते.

'आरक्षण योद्धा' कादंबरीचे प्रकाशन

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : आरक्षणाच्या लढ्यात एखाद्या व्यक्तीने व्यवस्थेला कंटाळून आत्महत्या केली. असेल तर ती आत्महत्या नसून ती हत्या आहे. असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी केले. 'आरक्षण योद्धा' या कादंबरीच्या प्रकाश सोहळ्यात ते बोलत होते.

मोहन परिमल लिखित 'आरक्षण योद्धा' या कादंबरीचा प्रकाशन सोहळा मंगळवारी सायंकाळी श्रमिक पत्रकार भवन सभागृहात पार पडला. यावेळी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, प्रेस क्लब नागपूरचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, ज्येष्ठ पत्रकार व नाट्य समीक्षक प्रभाकर दुपारे, माजी प्राचार्य डॉ. अशोक काळे उपस्थित होते.

जोशी म्हणाले. मराठीत कादंबरी लिहिणारे लेखक हे पत्रकार आहेत. कारण पत्रकारांमध्ये छोट्याशा घटनेला फुलवण्याची कला असते. यावेळी प्रमुख उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते आरक्षण योद्धा या कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले.

गेवराईमध्ये मुलापाठोपाठ आईचीही आत्महत्या

छत्रपती संभाजीनगर : बीड जिल्ह्याच्या गेवराई तालुक्यातील वाहेगाव आमला येथील एका मुलाने आत्महत्या केली. त्या धक्क्यानंतर पाठोपाठ आईनेही जीवन संपवले.

अभिमान खेत्रे (वय ३६) असे मृत मुलाचे तर कौशल्या भागुजी खेत्रे (वय ७०) असे आईचे नाव आहे. अभिमान खेत्रे यांनी रविवारी गळफास घेत आत्महत्या केली.

त्यानंतर सोमवारी कौशल्या खेत्रे यांनी विष प्राशन केले. त्यांना उपचारासाठी बीडच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान मंगळवारी सकाळी त्यांचा मृत्यू झाला.

पोलिसांच्या चौकशीनंतर युवकाची आत्महत्या

(पान १ वरून) हिरणवार टोळीचा सदस्य शक्ती यादव याचाही मित्र होता. शेखू खान आणि हिरणवार टोळीशी आबूचे मैत्रीपूर्ण संबंध होते. तो एका कॅफेमध्ये काम करीत होता. अविनाश भुसारी याचा १४ एप्रिलला बंटी हिरणवार आणि शक्ती यादव यांनी गोळ्या घालून खून केला. अविनाश हा सोशा कॅफेसमोर उभा आहे, ही टीप आबूने दिली होती, अशी चर्चा होती. अविनाशच्या हत्याकांडात आतापर्यंत १३ आरोपी पोलिसांनी जेरबंद केले. आबूलाही गुन्हे शाखेने अंबाझरी पोलीस ठाण्यात चौकशीसाठी बोलावले होते बोलावले तेव्हा हजर होण्याचे आदेश पोलिसांनी दिले होते. पोलिसांच्या चौकशीमुळे आबू घाबरला होता. त्यामुळे त्याने आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला.

सैन्याला पूर्ण अधिकार

(पान १ वरून) संभाव्य लष्करी कारवायांबाबत धोरणांवर शिक्कामोर्तब केले जाईल, असे मानले जात आहे. बुधवारीच केंद्रीय राजकीय व आर्थिक समित्यांच्याही बैठका होणार आहेत. केंद्राच्या राजकीय समितीमध्ये उपरोक्त पाच मंत्र्यांसह केंद्रीय रस्ते व वाहतूकमंत्री नितीन गडकरी, आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा, कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आदी मंत्र्यांचा समावेश आहे. सैन्यदलांची तयारी, देशातील राजकीय परिस्थिती व आर्थिक ताकद या तीनही मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केल्यानंतर धोरण निश्चित होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

आंबा, धान्य महोत्सव २ 'मे'पासून

हापूस, कलेक्टरसह विविध आंब्याचे प्रदर्शन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडून २ मे ते ५ मे दरम्यान नागपुरातील श्रीमती कुसुमताई वानखेडे सभागृह, उत्तर अंबाझरी मार्ग, अलंकार टॉकिजजवळ आंबा व धान्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. येथे हापूस, कलेक्टरसह राज्याच्या विविध भागातील आंबे, मिलेट, धान्य माफक दरात विक्रीसाठी उपलब्ध राहील. उत्पादक शेतकरी ते थेट ग्राहक विक्री संकल्पना असल्याने ग्राहकांनाही कमी दरात या वस्तू मिळतील, असा दावा पत्रकार परिषदेत मंडळाचे उपसरव्यवस्थापक अजय कडू यांनी दिली.

बाजार समितीच्या गणेशपेठ येथील इमारतीत झालेल्या पत्रकार परिषदेत कडू म्हणाले, सध्या तृणधान्यापासून मूल्यवर्धित उत्पादने तयार करणारे नवउद्योजक मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक उत्पादन, शेतकरी बचत गट, सहकारी संस्था, नवउद्योजक कंपन्या, स्टार्टअप कंपन्यांच्या माध्यमातून व्यवसाय करत आहे. या सगळ्यांना थेट ग्राहक व बाजार उपलब्ध करून देण्यासाठी हा महोत्सव आहे.

महोत्सवात कोकणचा हापूस, केशर आंबा, विदर्भातील गडचिरोलीतील गोला आंबा, कलेक्टर आंब्यासह विविध प्रकारचे आंबे, मिलेट्स व धान्यही विक्रीसाठी उपलब्ध राहील. खरा वास्तविक आंबा कसा ओळखावा याचीही माहिती महोत्सवात दिली जाईल. त्यामुळे ग्राहकांची हापूसच्या नावाने होणारी फसवणूक थांबेल, असेही कडू म्हणाले. महोत्सवात ५५ ते ६० स्टॉल राहणार असल्याचेही कडू यांनी सांगितले. निश्चित तारखेला रोज सकाळी ९ ते रात्री ९ वाजतापर्यंत चालणाऱ्या महोत्सवात लाह्या, रोस्टेड ज्वारी व बाजरा, इडली मिक्स, कुटकीचे लाडू असे अनेक प्रक्रियायुक्त पदार्थ मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

चौथीही मुलगी झाल्याने जन्मदात्रीकडून हत्या

लोकसत्ता वार्ताहर

कासा : चौथे अपत्य मुलगी झाल्यामुळे पश्चिम बंगाल येथून डहाणूतील लोणीपाडा येथे आई-वडिलांकडे आलेल्या पूनम शहा हिने मुलीची हत्या केली. हा प्रकार डहाणू उपजिल्हा रुग्णालयात शनिवारी मध्यरात्री घडला. याबाबत डहाणू पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पश्चिम बंगाल येथे राहणारी पूनम शहा ही महिला गेल्या काही दिवसांपूर्वी डहाणू लोणीपाडा येथे राहणाऱ्या आपल्या आईच्या घरी प्रसूतीसाठी आली होती. या महिलेची मागील आठवड्यात लोणीपाडा येथे सुरक्षित गृहप्रसूती झाली होती. त्यानंतर तिला बाळासह डहाणू उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अगोदर तिला तीन मुली असल्याने चौथे अपत्यही मुलगी झाली या नैराश्येतून तिने २६ एप्रिलच्या मध्यरात्री बाळाच्या नाकातोंडावर हाताचा पंजा ठेऊन तिचा जीव घेतला. या घटनेत बाळाचा गुदमरून मृत्यू झाला. त्याबाबत डहाणू पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नैराश्येपोटी हे पाऊल उचलल्याची कबुली तिने पोलीस चौकशीत दिली.

१८५ गुंतवणूकदारांची ४५ कोटींची फसवणूक

कंपनीच्या संचालकांसह १० जणांविरोधात गुन्हा

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई : गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून १८५ गुंतवणूकदारांची ४५ कोटी ४१ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी हैदराबादमधील कंपनीतील संचालक व प्रतिनिधींसह १० जणांविरोधात अंबोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

आरोपींनी गुंतवणुकीवर वर्षिक १२ ते १८ टक्के व्याज देण्याचे आश्वासन दिले होते. पण, रक्कम परत न करता कंपनी बंद करून फसवणूक केल्याचा आरोप आहे. गुंतवणूकदारांमध्ये चार्टर्ड अकाउंटंट, व्यावसायिक, चांगल्या पदावरील नोकरदारांचा समावेश आहे. याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा पुढील तपास करणार असल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली. हैदराबादमध्येही याबाबत गुन्हा दाखल असल्याची माहिती सूत्रांनी दिली. फसणूक झालेल्या गुंतवणूकदारांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

तक्रारदार स्मिता दुबे (३७) यांचा व्यवसाय असून त्या अंधेरी पश्चिम येथे राहतात. याप्रकरणी आरोपी कंपनी व संचालकांनी फाल्कन इन्वॉईस डिस्काउंटींग योजना राबवली. त्यात गुंतवणूक केल्यास वार्षिक १२ ते १८ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवण्यात आले. त्यानुसार महिलेने २५ जुलै, २०२४ रोजी त्यात गुंतवणूक केली होती.

आर्थिक गुप्तवार्ता कक्षाची स्थापना

मुंबईत गेल्या १० वर्षांत विविध गुंतवणूक योजनांद्वारे ५१ लाख गुंतवणूकदारांची १९ हजार ५०० कोटी रुपयांची फसवणूक झाली आहे. त्यामुळे गुंतवणूक फसवणूक रोखण्यासाठी मुंबई पोलिसांनी आर्थिक गुप्तवार्ता कक्षाची स्थापना केली आहे. फसवणूक होण्यापूर्वीच आर्थिक गुन्हे रोखण्यासाठी गुप्त माहिती गोळा करण्याचे काम या कक्षाद्वारे करण्यात येणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात अशा प्रकारे आर्थिक गुप्तवार्ता कक्षांची स्थापना करण्याचे नियोजन असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

करयुद्धाचा अमेरिकी उद्योगालाच फटका

न्यूयॉर्क : अमेरिकेने चीनविरोधात करयुद्ध सुरू केले असले, तरी त्याचा मोठा फटका अमेरिकेतील लघुउद्योगांना आणि इतर उद्योगांना बसत आहे. चीनकडून आयातीवर अवलंबून असलेल्या उद्योगांना फटका बसला असून, अनेक मोठ्या मागण्या रद्द कराव्या लागल्या आहेत. पुढील चित्र धुसर असल्याने अमेरिकेतील अनेक उद्योजक संभ्रमावस्थेत आहेत.

ट्रम्प प्रशासनाने चीनच्या वस्तूंवर १४५ टक्के कर लावला आहे. तेव्हापासून अमेरिकेतील चीनच्या वस्तूंवर अवलंबून असणारे उद्योजक अडचणीत आले आहेत.

श्रीराम फायनान्स लिमिटेड
SHRIRAM Finance
CIN No- L65191TN1979PLC007874
नोंदणीकृत कार्यालय : श्री टॉवर, प्लॉट नं. १४ए, दक्षिण भाग, औद्योगिक वसाहत, गुंडी, चेन्नई-६०००३२
प्रशासकीय कार्यालय : ६ वा मजला (लेव्हल २), इमारत क्र. क्यू २, औरम क्यू पार्क, जीईएन ४/१, टीटीसी, ठाणे-बेलापूर रोड, घणसोली, नवी मुंबई-४०० ७१०

सुवर्ण कर्ज लिलाव सूचना

खालील नमूद कर्जदारांना त्यांनी श्रीराम फायनान्स लि. (एसएफएल) कडून घेतलेल्या सुवर्ण अलंकारांच्या समक्ष कर्जाची ("सुविधा") त्यांची थकबाकी अदा करण्यासाठी सूचना वितरित करण्यात आली आहे. कर्जदार त्यांची सदर सुविधेंतर्गतची थकबाकी अदा करण्यास असमर्थ राहिल्यामुळे आम्ही तारण सुवर्ण अलंकारांचा **१२/०५/२०२५** (लिलावाची तारीख) रोजी लिलाव आयोजित करणार आहोत. सदर लिलावामधून काही अतिरिक्त रक्कम वसूल करण्यात आल्यास संबंधित कर्जदाराला ती परत करण्यात येईल आणि लिलावापश्चात त्यामध्ये तूट असल्यास, शिल्लक रक्कम योग्य कायदेशीर प्रक्रियेद्वारे कर्जदाराकडून वसूल करण्यात येईल. एसएफएलला कोणतीही पूर्वसूचना दिल्याविना खालीलपैकी कोणतेही खाते लिलावामधून काढून टाकण्याचा अधिकार आहे. काही अनपेक्षित घटना घडल्यास, एसएफएलने पूर्वसूचना न देता लिलावाची तारीख बदलण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

पार्टीचे नाव	पार्टीचे नाव	पार्टीचे नाव
आशिष श्रीराम राऊत	मोहम्मदगुलाम सरवरसादिक अनासरी	शुभम मनोहर डोर्ले
दुर्गाप्रसाद मोहनलाल सोनवणे	विनोद दयाराम मेश्राम	सोपान मुरलीधर ढोमणे
नेहल भीमराव बांबोर्डे		

वरील सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव पुढील पत्त्यावर होईल : श्रीराम फायनान्स लिमिटेड, श्री रहांगडाले बिल्डिंग, राजगोपालचारी वॉर्ड, पंजाब नॅशनल बँकेजवळ, भंडारा - ४४१९०४ - लिलावाची वेळ: दुपारी १२.०० वाजता.
वेळेच्या मर्यादेमुळे लिलाव त्याच दिवशी पूर्ण न झाल्यास सदर लिलाव लगतच्या कामकाजाच्या दिवशी समान वेळेला आणि अटींवर पुढे चालू राहील, याची कृपया नोंद घ्यावी. ग्राहकाचे निधन झाले असल्यास लिलावासंबंधित सर्व अटी त्याच्या / तिच्या कायदेशीर वारसांना लागू राहतील.
अधिक माहिती, अटी व शर्तीसाठी आणि लिलावामध्ये भाग घेण्याकरिता नोंदणी प्राप्त करण्यासाठी इच्छुक खरेदीदारांनी श्री. महेश गायकवाड (७२०८४१५१९५)/श्री. रोशन जुईकर (९९६७२००५७२) यांना संपर्क करावा.

सही/-
श्रीराम ऑटोमॉल इंडिया लिमिटेड
अधिमंडळ मान्यताप्राप्त लिलावकर्ते
श्रीराम फायनान्स लि. करिता
दिनांक: ३०/०४/२०२५
स्थळ: भंडारा

मध्य रेल्वे
नागपूर विभाग

खुली निविदा सूचना क्र. 25/04/2025 OF DRMWNGP-30-2025
कामाचे नाव:2025-26 आणि 2026-27 या वर्षांकरिता आपत्कालीन पाण्याचा पुरवठा करण्याची व्यवस्था. एडीईएन वर्धा उप-विभागान्तर्गत (दोन वर्षांकरिता) वर्धा, देहेगाव, कावठा, पुलगाव, तळणी, धामनगाव, दीपोरे, चांदूर, मालखेड, टीमटाला येथील रेल्वे कॉलनी व स्टेशन येथे तसेच मिड-सेक्शन आणि लेवल क्रॉसिंग गेट्स येथील गँग क्वार्टर्स येथे पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा करणे. **अंदाजे खर्च:** रु. 2534056.81, **बयाणा रक्कम:** रु. 50700/- **निविदा बंद होण्याचा दिनांक व वेळ** 16/05/2025, 15:00 तास. वरील कामाची ई-निविदा व ऑनलाइन सहभागासाठीचा संपूर्ण तपशील व सूचना रेल्वेची वेबसाईट **www.ireps.gov.in** येथे उपलब्ध आहे.
डीआरएम (कामे)
APEX-29 मध्य रेल्वे, नागपूर
असुरक्षित तसेच अनधिकृत रीतीने रेल्वे लाइन जवळ काम करणे दंडास पात्र गुन्हा आहे.

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat
परिशिष्ट - IV-A - अचल मालमत्तांची ई-लिलाव जाहीर विक्री सूचना
सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना
नोंदणीकृत कार्यालय: नववा मजला, अंतरिक्ष भवन, 22, कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-110001 फोन: 011-23357171, 23357172, 23705414, वेबसाईट: www.pnbhousing.com
शाखा कार्यालय: अचरज टॉवर, पहिला मजला, काटोल रोड, राजनगर, सदर, नागपूर -440013

याद्वारे खाली स्तंभ क्र.-अ मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ-ड मध्ये नमूद अचल मालमत्तेचा **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** (पीएनबी एचएफएल)/सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी रचनात्मक/प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ-क मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची **"जशी आहे जेथे आहे" आणि "जेथे जे काही आहे"** तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल.
याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम ह 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. अ मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार/गहाणदार/कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार/गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे.
विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया सुरक्षित धनको मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला **www.pnbhousing.com** येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार/ कायदेशीर वारसाचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचा प्रकार (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (ई)	बयाणा रक्कम (आरक्षित किमतीच्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणी दिनांक आणि वेळ (आय)	लिलाव दिनांक आणि वेळ (जे)	ज्ञात बोजे कोर्ट खटले असल्यास (के)
HOU/NAG/0820/809326 सुधीर श्यामलाल बघेल / मीनाक्षी सुधीर बघेल शा.का.: नागपूर	रु. 31,22,730.25 & 14-08-2024	प्रत्यक्ष	सिंगल बिल्डींग, तिसरा मजला, 302.0, हार्दिक राईज, प्लॉट क्र. 57 व 58, नामपा घर क्र. 496/ए57+58, ख.क्र. 11, 3/2, 7/1, 8 व 9, हार्दिक राईज, सिटी सर्वे, गोधनी रोड, नागपूर, तह. व जि. नागपूर, महाराष्ट्र -440030	रु. 31,73,000	रु. 3,17,300	30-05-2025	रु. 10,000/-	16.05.2025 रोजी दु. 12.00 ते 04.00 वाजेपर्यंत	31.05.2025 रोजी दु. 02.00 ते 03.00 वाजेपर्यंत	*निरंक / ज्ञात नाहीत

*सोबत भरण्याच्या व/वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार वर स्तंभ के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल/अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे/दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने/बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार/बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. 1. आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता/अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल/ पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकूम नाही. 2. संभाव्य खरेदीदारांनी/बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ-के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया/आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथपर्यंतच मर्यादित नसून त्यांनी निविदा/बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदारास बोली प्रपत्रासोबत सदर लिलावाच्या अटी व शर्तीवर स्वाक्षरी करावी लागेल. 3. कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार/खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल, अन्यथा मालमत्ता/अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. 4. मे. सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, कॉर्पोरेट कार्यालय, प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरयाणा 122003, वेबसाईट-[illegible] हे प्राधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. मालमत्तेच्या पाहणीशी किंवा बोली दस्तावेज प्राप्त करण्याशी संबंधित कोणत्याही मदतीसाठी आणि कोणत्याही चौकशीसाठी किंवा नोंदणीसाठी आपण पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती विवेक लोढा यांचेशी टोल फ्री क्र.: 1800 120 8800. ई-मेल: auction@pnbhousing.com वर संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.
स्थान: नागपूर, दिनांक: 29.04.2025 **स्वा/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

Chola Enter a better life
चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड
कॉर्पोरेट कार्यालय: ''चोला क्रेस्ट'', सी 54 व 55, सुपर बी-4, थिरू वी का इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई - 600032
शाखा कार्यालय: चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड, प्लॉट क्र. 12, तिसरा मजला, एल अँड टी बिल्डिंग, वोकहार्ट हॉस्पिटल समोर, करण कोठारी ज्वेलर्सच्या बाजूला, शंकर नगर, नागपूर 440010. संपर्क क्र. श्री. अजय तिवारी, मोबा. क्र. 9765416141

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(1) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना याद्वारे कर्जदार/सह-कर्जदार/गहाणकार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तांचा मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड, त्यांचा उल्लेख यापुढे मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड असा करण्यात येईल, यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सांकेतिक ताबा घेतलेला आहे. सदर अनामत मत्तांची ''ई-लिलावा''च्या माध्यमातून ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर विक्री करण्यात येईल. याद्वारे सर्व लोकांना सूचित करण्यात येते की आम्ही www.auctionfocus.in/chola-lap या वेबसाईटच्या माध्यमातून जाहीर ई-लिलाव राबविणार आहोत.

अ. क्र.	कर्ज खाते आणि कर्जदार, सह-कर्जदाराचे नाव	अनु. 13(2) अंतर्गत मागणी सूचनेनुसार दिनांक आणि रक्कम	मालमत्ता / मालमत्तांचे वर्णन	आरक्षित किंमत बयाणा रक्कम बोली वृद्धी रक्कम -
1	**कर्ज खाते क्र.: HE01CDP00000038650 & HE01CDP00000008330** 1. **चंदन गिरीधर नराणकर,** द्वारे, गिरीधर नराणकर, सदनिका क्र. 408, सेंट मायकल स्कूल जवळ, तिरुपती प्राईम अपार्टमेंट, नगीना बाग रोड, चंद्रपूर, महाराष्ट्र - 442401. 2. **क्युब न्युरो सायकियाट्रिक क्लिनिक अँड डीॲडीक्शन सेंटर,** पहिला मजला, सारडा कॉम्प्लेक्स, आजाद गार्डन जवळ, गंज वॉर्ड, चंद्रपूर, महाराष्ट्र - 442401. **3. श्रद्धा राजेश चव्हाण,** सदनिका क्र. 408, सेंट मायकल स्कूल जवळ, तिरुपती प्राईम अपार्टमेंट, नगीना बाग रोड, चंद्रपूर, महाराष्ट्र-442401.	11/11/2024, 11.11.2024 रोजीनुसार रु. 27,83,822/-	सदनिका क्र. 408, क्षेत्रफळ सुमारे 66.42 चौ.मी. (बिल्ट-अप क्षेत्रफळ), चौथा मजला, तिरुपती प्राईम, बिल्डींग क्र. 02, जमिनीचे क्षेत्रफळ सुमारे 1846.37 चौ.मी. सिटी सर्वे क्र. 1693, शीट क्र. 19 (जुना शीट क्र. 1, ब्लॉक क्र. 14 व 19, प्लॉट क्र. 1/1, 1/2, 1/3 व 1/2 चा भाग), मौजा जरीपटका-1, सोबत सदर जमिनीमधील 33.86% अविभाजित हिस्सा व हितसंबंध, चंद्रपूर महानगर पालिका, चंद्रपूर च्या हद्दीत, तह. व जि. चंद्रपूर. चतुःसीमाः पूर्वेस - महापालिका रस्ता, पश्चिमेस - पॅसेज, उत्तरेस - सदनिका क्र. 407, दक्षिणेस - विंग-बी ची बिल्डींग. **सीआयएफसीएल यांना ज्ञात असलेले बोजे / दायित्वे: ज्ञात नाही**	रु. 40,50,000/- रु. 4,05,000/- रु. 50,000/-

ई-लिलाव दिनांक आणि वेळ: 20-05-2025 रोजी स. 11.00 ते दु. 1.00 वाजेपर्यंत (प्रत्येकी 3 मिनिटांच्या अमर्याद कालविस्तारांसह);
बयाणा रक्कम जमा करण्याचा शेवटचा दिनांक: 19-05-2025 (सायं. 5.30 वाजेपर्यंत); पाहणी दिनांक: 06-05-2025

1. सर्व इच्छुक प्रतिभागी/बोलीदारांना https://auctionfocus.in/chola-lap आणि https://cholamandalam.com/news/auction-notices या वेबसाईटला भेट देण्याची विनंती करण्यात येते. ई-लिलाव तपशील, मदत, प्रक्रिया आणि ऑनलाइन प्रशिक्षणाकरता, प्रस्तावित बोलीदार संपर्क करू शकतात. (संपर्क व्यक्ती: श्री मुहम्मद रहीस -81240 00030 / 6374845616, ईमेल आयडी: CholaAuctionLAP@chola.murugappa.com केवळ ई-लिलाव प्रशिक्षणासाठी मे. ऑक्शन फोकस यांच्याशी संपर्क करा, प्राची त्रिवेदी इ 9016641848
2. नियम व अटींच्या अधिक तपशीलासाठी कृपया https://auctionfocus.in/chola-lap आणि ई-लिलावात भाग घेण्यासाठी https://www.cholamandalam.com/news/auction-notices वर संपर्क साधावा.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, 2002 मधील नियम 9(1) अंतर्गत ही 15 दिवसांची वैधानिक विक्री सूचनादेखील समजण्यात यावी.

दिनांक: 30-04-2025
स्थान: नागपूर
स्वा/- प्राधिकृत अधिकारी
चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड